महाराष्ट्र शासन

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला.**

**दुरध्वनी क्र. ०७२४-२४३७०७८, २४३१९६० फॅक्स क्र.२४३७०७८**

जा.क्र.शावैमवसरुअ/आस्था-३ (नर्सिंग)/ 2842 /२१, दि.22/०४/२०२१.

# जाहिरात

# Walk In Interview

कोविड - १९ आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे अधिपरिचारीकेची **एकुण ४५ रिक्त पदे** निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे भरावयाची आहेत. सदर मुलाखत **दिनांक २६/०४/२०२१ रोजी दुपारी १२ वाजता** अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे घेण्यात येईल. उमेदवाराने अर्ज व सर्व शैक्षणिक कागदपत्रे व प्रमाणपत्रे (मुळ व नक्कल) मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. सदर पद भरती गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **शैक्षणिक अर्हता** | **ठोक मानधन** |
|---|---|---|---|
| १ | अधिपरिचारिका | बीएस्सी (नर्सिंग) / जी.एन.एम | २००००/- |

अटि व शर्ती

१) सदर नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर आदेशाच्या दिनांकापासुन १२० दिवस किंवा कोविड-१९ हा साथरोग नियंत्रणात येईल पर्यंत राहिल.

२) सदरील पदावर कंत्राटी स्वरुपात कार्यरत उमेदवारास भविष्यात सदरील पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा कोणताही हक्क राहणार नाही.

३) सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावर तात्पुरती असल्याने कोणतीही नोटीस अथवा कारण न देता उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच सेवा समाप्त झाल्यावर त्यांना कोणत्याही न्यायालयात नेमणुक संबंधित दावा करण्याचा हक्क राहणार नाही अथवा शासनाकडे अर्ज करता येणार नाही.

४) सदर कालावधीत काम असमाधानकारक आढळल्यास उमेदवारास कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५) अधिष्ठाता कार्यालयातुन वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश उमेदवाराला बंधनकारक राहतील.

६) उमेदवारांना अन्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सार्वजनिक सुटट्यांचा लाभ मिळेल.

७) उमेदवारांना म.ना.से. नियम १९८१ लागु राहणार नाही.

८) निवृत्त वेतन, गटविमा योजना, एन.पी.एस. योजना या सारखे ईतर कोणतेही लाभ उमेदवारास मिळणार नाही.

९) रिक्त पदांची संख्या वेळेवर कमी-अधिक होवू शकते.

१०) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, यांनी वरील नियमीत रिक्त पदे बदलीने अथवा सरळ सेवेने भरल्यास सदर आदेश आपोआप संपुष्टात येतील.

११) उमेदवाराची सेवा कोणतेही कारण न देता मुदतीपूर्व समाप्त करण्याचा अधिकार संस्था प्रमुखांना राहिल. तसेच कंत्राटी काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास एक महिन्याची आगाऊ सुचना किंवा एक महिन्याचे वेतन भरुन उमेदवाराला कार्यमुक्त करण्यात येईल.

१२) उच्च गुणवत्ता धारक व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

१३) उमेदवाराचे एम.एन.सी. रजिस्ट्रेशन झालेले असले पाहिजे.

१४) उमेदवाराला मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१५) उमेदवाराने कोणतीही चुकीची माहिती दिल्याचे उघडकीस आल्यास त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१६) वरीलप्रमाणे मुलाखतीसाठी उमेदवाराला स्वखर्चाने हजर रहावे लागेल. मुलाखतीसाठी पत्राने कळविण्यात येणार नाही.

१७) वरीलप्रमाणे नेमणुकीच्या अटी मान्य असल्यास नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणेपूर्वी उमेदवारांनी विहीत नमुन्यातील बंधपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिहून देणे बंधनकारक राहील.

१८) उमेदवाराने अर्ज ए-४ आकाराच्या को-या कागदावर करावयाचा असून त्यामध्ये खालिल बाबी अंतर्भुत असणे आवश्यक आहे.

अ) अर्ज केलेल्या पदाचे नाव आ) अर्जदाराचे नाव व सही इ) स्वतःचा संपुर्ण पत्ता ई) दुरध्वनी / मोबाईल क्रमांक उ) शैक्षणिक अर्हता ऊ) कामाचा अनुभव - संस्थेचे नांव, अनुभव कालावधी, ए) संगणकाचे ज्ञान, एमएसआयटी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र ऐ) शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, संबंधित प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र, स्वतःचे अलिकडील पासपोर्ट आकाराचे ०४ फोटो

१९) सदर जाहीरातीमध्ये कोणताही बदल अथवा रद्द करण्याची किंवा कोणत्याही वेळी निवड यादी रद्द करण्याचे अधिकार मा.अधिष्ठता यांना राहतील.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
सर्वोपचार रुग्णालय, अकोला.

प्रत : मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना माहितीस्तव.